उत्तर प्रदेश राज्य मार्ग परिवहन महामंडळ, अलिगढ़

विरुद्ध

उत्तर प्रदेश शासन आणि इतर.

२७ मार्च १९९७

[न्यायमूर्ती गण: के. रामास्वामी आणि जी. बी. पटनायक,]

भूसंपादन अधिनियम, १८९४ : कलम ४ (१), १८ व २३.

भूसंपादन-—जिल्हाधिकाऱ्यांकडून नुकसान भरपाईचा निवाडा – संदर्भ न्यायालयाने निवड्याच्या नुकसान भरपाईच्या रकमेमधे वाढ केली - उच्च न्यायालयाने परिसीमा अधिनियमानुसार दाखल करण्यास विलंब या कारणास्तव अपील फेटाळलेल - सर्वोच्च न्यायालयात अपील – अधिक मोबदला मिळण्याच्या पुष्ट्यर्थ दोन विक्रीपत्र दाखल करण्यात आले होते, परंतु त्या विक्रीपत्रांची पुष्टी करण्यासाठी विक्रेत्याला किंवा विकत घेणार यांना साक्षीदार म्हणून तपासले नाही करिता स्वीकार्य पुरावा म्हणून  कायदेशीररित्या ते

विकृपत्र ग्राह्य धरले जाऊ शकत नाहीत किंवा विचारात घेतले जाऊ शकत नाहीत - उच्च न्यायालयाने तसेच संदर्भ न्यायालयाने अवलंबलेला दृष्टीकोन हा कायद्याने योग्य नाही -संदर्भ आणि उच्च न्यायालयाच्या खंडपीठाचा निर्णय आणि हुकूम रद्द केला जातो - कायद्यानुसार नव्याने निकाली काढण्यासाठी प्रकरण उच्च न्यायालयाकडे हस्तांतरित केले जाते.

दिवाणी अपील अधिकार क्षेत्र : १९९५ चे दिवाणी अपील क्रमांक ४९८०-८६.

अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या 1994 साल च्या प्रथम अपील क्रमांक 271, 270, 273, 274, 268, 272 आणि 269 मधील 17.10.94 रोजीच्या निर्णय आणि आदेशावरून.

प्रमोद स्वरूप याचिकाकर्त्याकडून.

प्रतिवादींसाठी एस. के. वर्मा, चंद्रशेखर, आय. एम. खान आणि एम. ए. खान.

न्यायालयाने खालील आदेश पारित केला:

अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने १७ ऑक्टोबर १९९४ रोजी प्रथम अपील क्रमांक २७१/१९९४ व इतर समान प्रकरण समूह मध्ये दिलेल्या आदेशातून विशेष अनुमति द्वारे हे अपील करण्यात आले आहे.

कलम ४ (१) भूसंपादन अधिनियम १८९४(थोडक्यात, "अधिनियम") अन्वये अधिसूचना ३ जून १९७९ रोजी प्रकाशित झाली ज्यानुसार सार्वजनिक कारणासाठी म्हणजे रस्ते वाहतूक डेपो उभारण्यासाठी २४.९ एकर जागा अधिग्रहीत करून भूसंपादन अधिकाऱ्यांनी प्रति चौरस यार्ड ११.२५ रुपये दराने मोबदला दिला. अधिनियमाच्या कलम १८ अन्वये अतिरिक्त जिल्हा न्यायाधीशांनी आपल्या निर्णयाद्वारे व आदेशाद्वारे नुकसान भरपाई २५ रुपये प्रति चौरस यार्ड पर्यंत वाढविली. त्यावर उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने विलंब परिसीमा ओलांडल्याच्या कारणास्तव अपील फेटाळून लावले आहे. त्यामुळे येथे आव्हान देण्यात आले.

आमच्या सूचनेनुसार पक्षकारांच्या अभ्यासू वकिलांनी खाली न्यायालयात सादर केलेले पुरावे आमचे समक्ष ठेवले. ही सर्वमान्य आहे की अधिक नुकसान भरपाईच्या दाव्याच्या समर्थनार्थ दोन विक्री करार दाखल करण्यात आले आहेत. परंतु त्या कागदपत्रांची शाबित करण्यासाठी विक्रेत्याची किंवा विकत घेणाऱ्याची साक्षीदार म्हणून तपासणी केली गेली नाही  करीत ते विक्रीपत्र कायदेशीररित्या ग्राह्य पुरावा म्हणून स्वीकार्य नाहीत किंवा विचारात घेतले जाऊ शकत नाहीत. संदर्भ न्यायालयानेही कायदेशीर दृष्टीकोनातून कथनांचा योग्य विचार केला नाही. त्यामुळे उच्च न्यायालय तसेच संदर्भ न्यायालयाने अवलंबलेला दृष्टिकोन कायद्याने योग्य नसल्याचे आमच्या निदर्शनास आले आहे. मात्र, प्रकरणाच्या गुणवत्तेबाबत आम्ही कोणतेही मत व्यक्त करीत नाही. आम्ही संदर्भ न्यायालयाचा आणि उच्च न्यायालयाच्या खंडपीठाचा निर्णय आणि आदेश रद्द करीत आहोत. आम्ही असे निर्देशित करतो की प्रकरण संदर्भ न्यायालयात परत पाठवून पक्षकारांना नव्याने पुरावे सादर

करण्याची संधी द्यावी, व या न्यायालयाने आखून दिलेल्या कायद्याच्या पार्श्वभूमीच्या अनुषंगाने त्या पुराव्यांचा विचार करावा आणि त्यानंतर हा आदेश प्राप्त झाल्यापासून सहा महिन्यांच्या आत त्याप्रमाणे नुकसानभरपाई निर्णय घ्यावा, असे निर्देश देऊन हे प्रकरण संदर्भ न्यायालयाकडे पाठवले जाते.

त्यानुसार अपील मंजूर, परंतु असलेल्या परिस्थितीत खर्चाचे आदेश नाही.

टी.एन.ए. अपील मंजूर .

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन

वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x